# <u>प्रेसनोट</u>

दि. १४/०५/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कनिष्ठ अभियंतावर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी – चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३० वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. स्वप्नील मनोहर पाटील, वय ४० वर्ष, पद – कनिष्ठ अभियंता, पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,००,०००/- (एक लाख) रुपये |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी रक्कम | १,००,०००/- (एक लाख) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,००,०००/- (एक लाख) रुपये |
| पडताळणी दिनांक | १४/०५/२०२५ |
| सापळा दिनांक | १४/०५/२०२५ |
| ठिकाण | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्यालयासमोर रस्त्यावर, पिंपरी, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९९२३४४४९९८) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांची श्री ट्रेडींग नावाची कंपनी आहे. सदर कंपनीमधुन वायु गळती होवून वास येतो म्हणून या प्रदुषणाबाबत पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे ऑनलाईन तक्रार आली होती. सदर तक्रारीवरुन लोकसेवक स्वप्नील पाटील, कनिष्ठ अभियंता, पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी दि. २४/४/२०२५ रोजी तक्रारदार यांच्या श्री ट्रेडींग कंपनीमध्ये स्थळपाहणी करुन पंचनामा केला व पुढील कारवाई न करण्यासाठी त्यांनी तक्रारदारांकडे १,००,००० रुपयांच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि. १४/५/२०२५ रोजी तक्रारदाराने ला.प्र.वि. पुणे येथे केली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. १४/५/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक स्वप्नील पाटील यांनी तक्रारदाराकडे त्यांच्या कंपनीवर पुढील कारवाई न करण्यासाठी १,००,०००/- रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निषन्न झाले.

आज दि. १४/५/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये, लोकसेवक स्वप्नील पाटील यांनी तक्रारदाराकडून वरील कामासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्यालयासमोर रस्त्यावर १,००,००० रुपयाची लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, लोकसेवक स्वप्नील पाटील यांचेविरुद्ध पिंपरी पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.